Open Access

IJASSH

International Journal of Arts, Social Sciences and Humanities

**(A Quarterly, Refereed, & Peer Reviewed International Journal)**

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://ijassh.aaassher.org/

ISSN (Online): 2584-1130

Volume 1, Issue 2, June 2023; Pages 12 – 16

DOI: 10.5281/zenodo.10223733

**Original Research Article**

# गर्भपात: एक नैतिक समस्या

प्रा. सुवर्णा उमाकांत टेंकाळे

तत्त्वज्ञान विभाग, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हाडोळती ता. अहमदपूर जि. लातूर ४१३५१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail:* suvarnawale61490@gmail.com

Received: 07 April, 2023 | Accepted: 14 May, 2023 | Published: 17 May, 2023

## प्रस्तावना

प्राचीन काळी सर्वच देशांमध्ये गर्भवती स्त्रीला मानाचे स्थान होते. त्या काळात गर्भपात भयंकर गुन्हा समजला जात असे, तसेच गर्भपातासंबंधी कोणत्याही प्रकारे सामाजिक किंवा कायदेशीर दृष्टिकोनातून विचार केला जात नसे. पण जेव्हा अनेक देशांची लोकसंख्या वेगाने वाढू लागली, तसेच आधुनिक वैद्यकीय सोयी सुविधामुळे जन्मपूर्व अवस्थेतील अडचणी अगोदरच लक्षात येऊ लागल्या तेव्हा गर्भपातासंबंधीचे नैतिक व कायदेशीर प्रश्न निर्माण झाले.

गर्भधारणा करणे ही निसर्गाने स्त्रीला दिलेली देणगी होय. प्राचीन काळापासून असे मानले जाते की स्त्रीचे पूर्णत्व आई होण्यातच आहे.जेव्हा ती गर्भवती होऊन बाळास जन्म देते तेव्हाच तिला पूर्णत्व प्राप्त होते, परंतु आधुनिक काळात गर्भधारणे ऐवजी गर्भपाताच्या अधिकाराची मागणी स्त्रियाद्वारे केली जाऊ लागली आहे. बहुतांशी देशात गर्भपातास कायदेशीर मान्यता मिळालेली दिसून येते. परंतु प्रश्न असा निर्माण होतो की, कायद्याने याला म्हणजेच गर्भपातला मान्यता मिळाली असली तरी नैतिक दृष्टिकोनातून हे योग्य आहे काय? एका निष्पाप जीवाची गर्भात हत्या करणे हे वैयक्तिक आणि सामाजिक पाप नाही काय? या विषयाचा संबंध केवळ स्त्रीस आहे की तिच्या गर्भात वाढणाऱ्या एका जीवाचाही प्रश्न आहे? जन्मास आलेल्या व्यक्तीप्रमाणे गर्भास जगण्याचा संपूर्ण अधिकार आहे की नाही? यासारखे अनेक प्रश्न गर्भपाताच्या समस्येच्या संदर्भात समोर येतात. त्यामुळे गर्भपात ही आधुनिक काळातील एक वैद्यकीय व नैतिक समस्या बनली आहे.

**महत्त्वाचे शब्द:** गर्भपात, प्राचीन काळ, स्त्री, संगोपन, जे. जे. थॉमसन., अपंग, माता - पिता, विवाह, मतिमंद

**संशोधनाचे उद्दिष्ट:** गर्भपाताच्या समर्थनार्थ युक्तिवाद तसेच गर्भपात विरोधी युक्तिवाद अभ्यासणे.

**गृहीतक:** काही विशिष्ट परिस्थितीमध्ये नैतिक व मानवतावादी दृष्टिकोनातून गर्भपात समर्थनी आहे.

गर्भपाताची समस्या: गर्भपाताची समस्या ही प्रामुख्याने दोन विषयाशी निगडित असलेली दिसून येते. एक म्हणजे मौलिक जीवन सिद्धांताची मूल्ये आणि दुसरी म्हणजे व्यक्तिगत स्वातंत्र्याचा सिद्धांत मौलिक जीवन सिद्धांताची मूल्ये यात जन्मास न आलेल्या गर्भाच्या जीवन मृत्यूचा प्रश्न निर्माण होतो. तर व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या सिद्धांतात गर्भवती स्त्रीच्या जीवन मृत्यूचा प्रश्न निर्माण होतो. व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या सिद्धांतामध्ये गर्भावस्थेतील जीवांच्या जीवन मूल्याचा विचार असतोच,परंतु त्याहीपेक्षा गर्भवती स्त्रीचा आपल्या शरीरावर अथवा जीवनावर अधिकार आहे किंवा नाही हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

**गर्भपाताचा अर्थ**

१. भावी मनुष्याच्या व्यक्तित्वाचा नाश होणे म्हणजे 'गर्भपात' होय.
२. ‘गर्भपात ही अशी प्रक्रिया आहे की ज्या प्रक्रियाद्वारा एखाद्या गर्भास परिपक्व होण्यापूर्वीच संपवून टाकले जाते'.
३. ‘गर्भावस्थेतील जीवास जन्म घेण्यापूर्वीच त्याचे जीवन संपवण्याची प्रक्रिया म्हणजेच गर्भपात होय'.
४. ‘गर्भपात म्हणजे वैद्यक शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून गरोदरपणाची अवस्था हेतूपूर्वक संपविणे होय'.

**गर्भपाताचे प्रकार**

१. **स्वाभाविकपणे अथवा नैसर्गिकरित्या होणारा:** गर्भपात ही स्वाभाविक अथवा नैसर्गिक प्रक्रिया आहे तिचे स्वरूप इतर शरीर धर्मासारखे असते.
२. **हेतू पूर्वक घडून आणलेला:** हा गर्भपात स्वभाविक नसतो, तर तो हेतूपूर्वक घडून आणलेला असतो. ज्यात गर्भवती स्त्री स्वतः अथवा इतरांच्या म्हणजेच वैद्यकीय व्यावसायिकाच्या मदतीने गर्भपात घडवून आणत असते. अर्थातच नैतिकतेची समस्या हेतूपूर्वक घडवून आणलेल्या गर्भपाताच्या संदर्भात निर्माण होते.

**गर्भपाताच्या समर्थनार्थ युक्तिवाद**

गर्भपाताचे समर्थन करणाऱ्या विचारवंताच्या मते गर्भवतीच्या इच्छेनुसार तिला गर्भपात करून घेण्याचा पूर्ण अधिकार असला पाहिजे. त्याची कारणे खालील प्रमाणे आहेत.

१. *आर्थिक कारण:* गर्भवती स्त्री आपल्या गर्भाचा आणि पुढे होणाऱ्या बाळाच्या पालनपोषणाचा खर्च उचलण्यास स्वतःला असमर्थ समजते तेव्हा ती गर्भपात करण्याचा निर्णय घेते, तसेच प्रतिकूल परिस्थितीमुळे आधी असलेल्या मुलाचे संगोपन करावे की परत बाळाला जन्म द्यावा या द्विधा मनस्थितीत असताना ती गर्भपाताचा निर्णय घेत असते.
२. *गर्भवती स्त्रीच्या आरोग्याला व जीवाला धोका:* ज्यावेळी गर्भामुळे गर्भवती स्त्रीच्या आरोग्याला व जीवाला धोका निर्माण होतो, त्यावेळी गर्भपात करणे शक्य आहे. अशावेळी निश्चितच त्या गर्भवती स्त्रीचे जीवन मूल्यवान

मानले जाते. प्रत्येकाचे जीवन मौल्यवान असते, परंतु गर्भावस्थेच्या दरम्यान अशी बिकट परिस्थिती आली तर, नैतिक दृष्टिकोनातूनच स्त्रीला वाचविणे योग्य ठरते. जे. जे. थॉमसन या विचारवंताच्या मते प्रत्येकाचे जीवन मौल्यवान आहे, परंतु गर्भावस्थे दरम्यान आईच्या बिकट परिस्थितीत एकाच्या जीवनाचा त्याग करावा लागतो. अशावेळी गर्भाच्या (भ्रणाच्या) जीवनाचा त्या करणे अधिक श्रेयसकर आहे. जेणेकरून आईचे जीवन वाचविता येईल.

३. *विकृत भ्रमासंबंधी समस्या:* आज विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे गर्भाची स्थिती काय आहे ते कळू शकते,त्यामुळे गर्भात काही अनुवंशिक दोष आहेत का? याची पाहणी करता येते. अशा परिस्थितीत त्या दोषपूर्ण गर्भाला जन्म द्यावा की नाही ही अडचण निर्माण होते व गर्भपाताचा निर्णय घेतला जातो. कारण अपंग व विकृत भ्रणाला जन्म देऊन त्याच्या पालन पोषणाची जबाबदारी जर माता-पिता घेऊ इच्छित नसतील, तर अशा भ्रणाच्या पुढच्या आयुष्याचा प्रश्न निर्माण होतो, व गर्भपाताचा निर्णय घेतला जातो.

४. *बलात्कार व व्याभिचार:* बलात्कार व व्याधीचारातून निर्माण होणाऱ्या गर्भाच्या बाबतीत अनुकूल बाजूने विचार करता येणे शक्य नाही. त्यामुळे नैतिक दृष्टिकोनातून गर्भपात करणे योग्य आहे. यात त्या स्त्रीचा व बाळाचा दोष नसतो पण, त्याचा स्वीकार समाज करेल? त्यांना समाज इतराप्रमाणे मानाचे स्थान देईल का?असे अनेक प्रश्न या संदर्भात निर्माण होतात.

५. *निर्णय स्वातंत्र्य:* गर्भधारणा ही स्त्रिच्या शरीरात होते. त्यामुळे जोपर्यंत शिशू जन्मास येत नाही तोपर्यंत त्या स्त्रीच्या शरीराचा भागच आहे असे मानले जाते.म्हणून त्याला गर्भात ठेवायचे ,संपवायचे की जन्म द्यायचा? हा पूर्ण अधिकार त्या स्त्रीला आहे. केवळ गर्भवती होऊन बाळाला जन्म देणे ही स्त्रीची जबाबदारी नाही तर त्याचे पालन पोषण पण तिला करावे लागते. म्हणून गर्भपात आणि त्याचे पालकत्व यावर निर्णय घेण्याचा अधिकार हा तिला स्वतःला हसायला पाहिजे.

६. *अनैच्छिक गर्भ:* बऱ्याचदा जबरदस्तीचा विवाह व गर्भनिरोधकाच्या अभावामुळे किंवा अनिछेने स्त्रीला गर्भधारणा होते, तेव्हा अशा अनैच्छिक गर्भास सांभाळणे, त्याच्या प्रसव वेदना सहन करणे आणि जन्मानंतर ही त्याच्याविषयी चिंतित राहणे, यापेक्षा गर्भपात नक्कीच वाईट नसतो. याविषयी जर जारवीस थॉमसन म्हणतात की' एका गर्भाला आईच्या शरीराचा उपभोग करण्याचा अधिकार आहे. जेव्हा तिने स्वतः तो अधिकार दिलेला असेल, परंतु जेव्हा इछाऐ शिवाय शिवाय गर्भधारणा होत असेल तर, तिला गर्भपात करण्याचा पूर्ण अधिकार आहे'.

७. स्त्री पुरुष संबंधातून राहिलेल्या गर्भाची जबाबदारी केवळ स्त्रीचीच असू शकत नाही. ती जबाबदारी केवळ स्त्रीवर ट**अन्यायकारक आहे. आणि ती जबाबदारी स्त्रीचीच असेल तर त्या गर्भापासून मुक्त होण्याचे (गर्भपात करून घेण्याचे) स्वातंत्र्य देखील तिलाच असले पाहिजे. अशी अनेक कारणे गर्भपाताच्या समर्थनार्थ दिसून येतात.

This journal is © AAASSHER 2023 

### गर्भपात विरोधी युक्तिवाद

१. स्त्री बीज आणि पुरुष बीजाचे मिलन होते, तेव्हापासून मानवी जीवनाला सुरुवात होते. म्हणून त्याला देखील पूर्ण विकसित मानावा एवढेच मूल्य मिळाले पाहिजे.

२. गर्भपात करणे म्हणजे निर्दोष मानवी जीवनाची हत्या करणे आहे. जो स्वतःची रक्षा करू शकत नाही. प्रत्येकाचे जीवन मौल्यवान असल्याने कोणालाही गर्भृस्त जिवाच्या या अधिकाराचे हनन करण्याचा अधिकार नाही.या मताचे समर्थक भ्रणाला या व्यक्तीच्या रूपात स्वीकारतात, म्हणून त्यालाही जगण्याचाही अधिकार असल्याचे मानतात.

३. गर्भपातामुळे गर्भवती स्त्रियांच्या शरीरावर आणि मनावर दीर्घकाळ टिकणारे वाईट परिणाम पडू शकतात.

४. बलात्कार किंवा व्याधीचारातून बहुतांशी उदाहरणार्थ गर्भधारनेची शक्यता खूप कमी असते. जरी ती शक्यता गृहीत धरली तरी कोणत्याही परिस्थितीत निर्दोष ग्रुप भृंणाचा जीवन जगण्याचा अधिकार बाधित होता कामा नये.

५. गर्भामुळे स्त्रीच्या आरोग्यास जीवितास धोका निर्माण होत असेल तर, अशा स्वरूपाचे धोके आज विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे दूर करता येऊ शकतात, त्यासाठी गर्भपात हा मार्ग असू शकत नाही.

६. जरी निष्काळजीपणे किंवा अनिच्छैने गर्भधारणा झाली असेल,तरी त्याला जन्म देऊन एखाद्या निपुत्रिक दांपत्याला दत्तक देऊन त्याच्या जीवनात आनंद निर्माण करता येतो.

७. आर्थिक अडचण ही गर्भासाठी अडथळा ठरू शकत नाही कारण आज समाजात अनेक सामाजिक संस्था, शासकीय अनुदानित संस्था अशा अनेक अनाथ व विकलांग मुलांना योग्य रीतीने सांभाळण्याचे कार्य करतात.

वरील युक्तीवादाच्या माध्यमातून विचारशील अस्तित्वाला नष्ट करणे सर्वार्थाने अयोग्य आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

### निष्कर्ष

गर्भपाता संदर्भातील वरील दोन्ही भूमिका पाहिल्यानंतर असे दिसते की, गर्भपात कधी नैतिक तर कधी अनैतिक ठरतो. ते परिस्थिती सापेक्ष आहेत. दोन्हीभूमिका मध्ये काही प्रमाणात सत्य आहे, परंतु पूर्ण अर्थाने त्या उचित नाहीत जसे गर्भपाताला विरोध करणे चुकीचे आहे.तसेच गर्भपाताचे समर्थन करणे हे चूक आहे. काही विशिष्ट परिस्थितीमध्ये नैतिक व मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करता गर्भपात समर्थनीय मानता येईल.

गर्भ जर मतिमंद विकलांग व्यंगात्मक व विक्तत असणारे बालक म्हणून जन्माला येणार असेल तर गर्भपात समर्थनीय मानता येईल. कारण ज्यांचे जीवन नंतर त्रासाने वेदनेने भरलेले आहे. ज्याला अपूर्ण आयुष्य जगायचे आहे त्याला या आधीच यातून मुक्त केले तर काय हरकत?

जर गर्भवती स्त्रीच्या आरोग्याला व जीविताला धोका असेल आणि तिचे आयुष्य वाचवायचे असेल, तर अशा परिस्थितीत गर्भपात करणे उचित ठरेल. कारण जो जीव अजून जन्माला यायचं आहे त्याचा विचार करून जो आता आहे त्याचा विचार न करणे नैतिक दृष्टिकोनातून योग्य नाही,त्यामुळे या परिस्थितीत गर्भपात करणे ही नैतिकतेची मागणी आहे.

काही वेळा अनिश्चेमुळे वा बलात्कारामुळे स्त्रियांना गर्भ राहतो. तेव्हा अशा बाळाला जन्म देण्यास स्त्री तयार नसते. अशा बाळाचे अठरा ते वीस वर्ष वयापर्यंत पालन पोषण करणे हे स्त्रीच्या दृष्टिकोनातून त्रासदायक असते. अशा अपवादात्मक परिस्थितीत गर्भपात करणे नैतिकदृष्ट्या समर्थनीय ठरते. शेवटी गर्भाला गर्भाशयातच वाढू द्यायची की, गर्भपात करून घ्यावयाचा याबाबतचा अंतिम निर्णय स्त्रीच घेऊ शकते. याबाबतीत समाजाने कोणतीही ढवळाढवळ करू नये. जर स्त्री कुठल्याही परिस्थितीत स्वतःच्या इच्छेने त्या बाळाला जन्म घालायला व त्याचे पालन पोषण करायला तयार असेल स्वतः सक्षम असेल तरच तिने बाळाला जन्म द्यावा, अन्यथा तिने गर्भपात केला तरी हरकत नाही.

**संदर्भ सूची**

१. Professional Ethics Medical and Legal Professions - Editor, Dr. Waman Patil, Dr. Sunil Salunke.
२. उपयोजित नीतीशास्त्र, प्रा. माधवी कवी.
३. नीतीशास्त्र, प्रा प्रा सुनील वसंतराव साळुंखे.